# [ 3 ]

## ः आरती देवीची ः

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी ।
अनाथ नाथे अंबे करूणा विस्तारीं ॥
वारीं वारीं जन्ममरणातें वारीं ।
हारी पडलों आतां संकट नीवारीं ॥ 1 ॥

जय देवी जय देवी महिषासुरमथिनी ।
सुरवरईश्वरवरदे तारक संजिवनी ॥ धृ.॥

त्रिभुवनभुवनीं पाहतां तुजऐसी नाहीं ।
चारी श्रमले परंतु न बोलवे कांहीं ॥
साही विवाद करितां पडले प्रवाहीं ।
ते तूं भक्तांलागी पावसीं लवलाही ॥ 2 ॥ जय देवी ॥

प्रसन्नवदने प्रसन्न होसी निजदासा ।
क्लेशापासुनी सोडीं तोडीं भवपाशा ॥
अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा ।
नरहरि तल्लिन झाला पदपंकज लेशा ॥ 3 ॥ जय देवी ॥